# एकात्मिक मधमाशी पालन विकास केंद्राची स्थापना



आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत २०२० मध्ये मधमाशी व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी ५०० कोटी रुपयांचे प्रावधान तीन वर्षांसाठी भारत सरकारने जाहीर केले होते. या योजनेमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम असून त्याद्वारे मधमाशी पालनाला शास्त्रोक्त पद्धतीने पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. नॅशनल बी बोर्ड, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत राबविल्या जात असलेल्या मधुक्रांती (Sweat Revolution) या कार्यक्रमाला जास्तीत जास्त आधार देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियानांतर्गत अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत.



कृषी फलोत्पादन क्षेत्रामध्ये मधमाशीच्या सहाय्याने उत्पादन वाढविणे, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी मधमाशी पालनाला प्रोत्साहन देणे, मधमाशी पालनासाठी आवश्यक असलेल्या सेवासुविधांची निर्मिती करणे, प्रक्रिया उद्योग, मध आणि इतर माध्यमातून मिळणाऱ्या इतर पदार्थांची गुणवत्ता तपासणे, मधमाश्यांवर येणाऱ्या विविध रोगांवर संशोधन करून त्याचे नियोजन करण्यासाठीच्या प्रयोगशाळा, परागीभवनाला भाडेतत्त्वावर मधमाश्यांच्या वसाहतींचा पुरवठा करणे, मधमाश्यांच्या मूलभूत तसेच प्रमाणित वसाहती तयार करणे, यासारख्या अनेक उपाय योजना या कार्यक्रमांतर्गत सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणजे एकात्मिक मधमाशी पालन विकास केंद्राची स्थापना करणे.

देशामध्ये या प्रकारच्या एकूण १२ केंद्रांना मंजुरी दिलेली असून ज्या राज्यामध्ये मधमाशी पालन मोठ्या प्रमाणावर केले जाते त्या राज्यांची यासाठी निवड करण्यात आली आहे. हरियाणा, दिल्ली, बिहार, पंजाब, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, मणिपूर, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर, तामीळनाडू, कर्नाटक, हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, आंध्र प्रदेश आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये एकात्मिक मधमाशी पालन विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहे. तसेच बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये मधमाशी पालनासाठी पाच शेतकरी उत्पादन कंपन्यांची स्थापना करण्यात आली आहे. नॅशनल बी बोर्डाकडे एकूण १०,००० मधमाशी पालन करणारे व्यावसायिक तसेच मध आणि मधमाशी पालनापासून मिळणाऱ्या विविध पदार्थांवर काम करणाऱ्या संस्थांनी नोंदणी केली आहे. बी बोर्डाकडेही १६ लाख मधमाश्यांच्या वसाहतींची नोंदणी केलेली आहे. या सर्व उपक्रमाचा उद्देश हाच आहे की, मधमाशी पालनाला मोठ्या प्रमाणात चालना मिळावी. २०१३-१४ मध्ये मधाचे उत्पादन ७६ हजार टन होते. त्यामध्ये वाढ होऊन १२५ लाख टनांपर्यंत मधाचे उत्पादन वाढले आहे. मधाची निर्यातही याच कालखंडामध्ये २८ हजार टनांवरून ५९ हजार टनांपर्यंत पोहोचली आहे. मधाबरोबरच मेण, परागकण, प्रोपोलिस, रॉयल जेली, बी व्हेनम यांचेही उत्पादन वाढवून मोठ्या प्रमाणात अर्थार्जन तसेच रोजगार निर्मिती होऊ शकते. यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्राचा विचार करता मधमाशी पालनाला फार मोठा वाव आहे. परंतु यावर फारच कमी काम झाल्यामुळे आता या सर्व योजनांचा फायदा घेऊन राज्यामध्ये शेती उत्पादन वाढविण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करता येईल.

(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार) ■

# मधुक्रांती पोर्टलचा शुभारंभ

**मा**गील तीन वर्षांपासून देशामध्ये मधमाशी उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी मधुक्रांतीची (स्वीट रिव्हॉल्युशन) सुरुवात झाली. त्यासाठी मोदी सरकारकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली. मधुमक्षिका पालन हा विषय देशाच्या कृषी मंत्रालयाला जोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन मधुक्रांती घडविण्यासाठी नॅशनल बी-कीपर्स ॲण्ड हनी मिशन (NBHM) म्हणजेच राष्ट्रीय मधपाळ आणि मध अधियानाची स्थापना केली. यामुळे मधमाशी पालनाला मोठी चालना मिळणार आहे. इतर उद्योग किंवा पिकांसाठी जसे नॅशनल बोर्ड आहे. त्याच धर्तीवर मधुक्रांतीसाठी नॅशनल बी बोर्डाची स्थापना करून; त्यांच्या माध्यमातून देशामध्ये सुरू असलेल्या मधमाशी उद्योगातील सर्व बाबींची माहिती संकलित करणे, त्यांचे रजिस्ट्रेशन करणे तसेच या व्यवसायाला आवश्यक त्या तांत्रिक, आर्थिक आणि विक्री व्यवस्थेसाठीच्या योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी मदत करणे यासारख्या विविध विषयांवर या बोर्डाचे काम सुरू झाले आहे.

आजचे युग हे डिजिटल आणि ऑनलाईनचे आहे याचाच विचार करून नॅशनल बी बोर्डाने मधुक्रांती या पोर्टलची संकल्पना मांडली. तांत्रिक आणि अर्थसहाय्यासाठी इंडियन बँकेसोबत भागिदारी केली. या पोर्टलचा एप्रिल महिन्यामध्ये केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते शुभारंभ झाला. मधुक्रांती या पोर्टलवर सर्व मधपाळ, मध उत्पादन, मध प्रक्रिया उद्योग तसेच विक्री व्यवसाय करणाऱ्या सर्वांनाच रजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे. यामुळे देशामध्ये कोणत्या राज्यात किती मधपाळ आहेत, मधमाश्यांच्या वसाहती आहेत याची माहिती मिळेल. तसेच त्यांच्या माध्यमातून तयार होणारे मध, त्याची विक्री किंवा खरेदी करणे, प्रक्रिया आणि मार्केटिंगची सुविधा या सर्व गोष्टींची माहिती याद्वारे मिळू शकते. मधामध्ये भेसळ होते ही समाजाची समजूत असल्यामुळे आज मधाचे सेवन पाहिजे त्या प्रमाणात नाही याचा विचार करून, मधाचे उत्पादन ते विक्री व्यवस्था यांची माहिती देऊन भेसळ कमी करणे शक्य होईल. तसेच या देशातील आणि जागतिक स्तरावरील मधमाशीपासून मिळणारे मध आणि इतर पदार्थांच्या गुणवत्तेचे प्रमाण तपासून त्यानुसार प्रमाणित करणे ही बाब अनिवार्य करण्यात येणार आहे. त्यासाठी गुजरातमधील आणंद येथे जागतिक स्तरावरील




गुणवत्ता तपासण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली.

मधुक्रांतीच्या माध्यमातून मधमाशी उद्योगाला प्रोत्साहन देऊन देशात तसेच जागतिक बाजारपेठेत मधमाशी पालनातून मिळणाऱ्या विविध पदार्थांचे मार्केट वाढविणे हा उद्देश यामागे आहे. यातून देशामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल तसेच या व्यवसायातून मोठी आर्थिक उलाढाल होईल हे अपेक्षित आहे. देशातील कृषिक्षेत्रातील इतर क्रांत्यांप्रमाणेच या क्रांतीलाही पुढील एक दशकामध्ये मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देऊन मधमाशी पालनाला देशामध्ये शाश्वत स्थान मिळवून देणे हीच काळाची गरज आहे.

(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)